# सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## (सामान्य प्रशासन विभाग- कर्मचारी भरती/पदोन्नती कक्ष)

## कंत्राटी पद्धतीने शहर समन्वयक (City co-ordinator) पदावर नियुक्तीबाबत.

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेस महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग यांचेकडील क्रमांक: स्वमअ-२०२४/CN ७२६०९९/नवि-३४, दिनांक : २०/०६/२०२५ व महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र विकास अभियान संचालनालय, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) यांचे पत्र.क्र./राअस/शहर समन्वयक/७९६/२५-२६, दिनांक : २०/०६/२०२५ रोजीच्या पत्रानुसार अकरा महिन्यांच्या कालावधीकरिता कंत्राटी पध्दतीने शहर समन्वयक (City co-ordinator) या पदासाठी इच्छुक उमेदवारांकडून दिनांक : १२/०८/२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत अर्ज मागविण्यात येत आहेत.

| पदांचे नाव | तपशील |
|---|---|
| शहर समन्वयक (City co-ordinator) | पदसंख्या - २. |
| शैक्षणिक अर्हता | मान्यता प्राप्त विद्यापीठातील खालीलपैकी कोणत्याही शाखेतील पदवी.<br>अ.) B.E. / B. Tech (कोणतीही शाखा). ब.) बी.आर्क.<br>क.) बी. प्लॅनिंग. ड.) बी.एस.सी. (कोणतीही शाखा) |
| मानधन | र.रु.४५,०००/-<br>३ वर्षांहून अधिक काळाचा अनुभव असलेस मानधनात वाढ करण्याचा विचार करण्यात येईल. |
| अनुभव | स्थानिक स्वराज्य संस्था (नागरी) कार्यालयाशी निगडित कामाचा किमान सहा महिन्यांचा अनुभव आवश्यक आहे. |
| वयोमर्यादा | कमाल वयोमर्यादा ३५ वर्षे (शहर समन्वयक म्हणून अनुभव धारण करणाऱ्या उमेदवारांस अनुभवाइतकी वयोमर्यादा शिथिल करता येईल.) |

**उमेदवारांना सर्वसाधारण सूचना व अटी :-**

- उमेदवाराने अर्जासोबत स्वतःचे अलीकडच्या काळातील फोटोसह अर्ज शैक्षणिक अर्हता, अनुभव, आधार कार्ड, ओळखपत्र, जन्म तारखेचा दाखला इत्यादी कागदपत्राच्या साक्षांकित प्रतीसह अर्ज **मा. सहायक आयुक्त , सा.प्र.वि.-कर्मचारी भरती/पदोन्नती आपटा पोलिस चौकी, चौकोनी पाण्याची टाकी, पहिला मजला सांगली**, येथे दिनांक : १२/०८/२०२५ रोजीपर्यंत सादर करण्याचा आहे. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.
- प्राप्त अर्जांची छाननी करून पात्र उमेदवारांची मुलाखतीनंतर अंतिम निवड करण्यात येईल. याबाबतच्या तारखा अलहिदा कळविण्यात येतील. उमेदवारांनी अर्जामध्ये त्यांचा सध्याचा राहण्याचा पत्ता व मोबाईल नंबर न चुकता नमूद करावा.
- सदर कंत्राटी तत्वावरील नियुक्ती ही निव्वळ ११ महिन्यांच्या तात्पुरत्या स्वरूपातील असून या नियुक्तीचा महानगरपालिका आस्थापनेवरील सेवेशी कोणताही संबंध नाही. नियुक्त करण्यात आलेल्या उमेदवारास महानगर पालिकेच्या सेवेत कोणत्याही प्रकारचा हक्क सांगता येणार नाही. अथवा कायदेशीर दाद मागता येणार नाही.
- निवड होणाऱ्या उमेदवारांना महानगरपालिकेच्या शर्ती, अटीनुसार विहित नमुन्यात पेपरवर बंधपत्र करून देणे बंधनकारक राहील.
- सदर जाहिरातीच्या नियुक्त्या, पदसंख्या, शर्ती, अटी यामध्ये बदल कमी, अधिक मजकूर इ. बदल वा प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार मा. आयुक्त यांच्याकडे राखून ठेवण्यात आले आहे.

मा. आयुक्त तथा प्रशासकसो यांचे मान्यतेने }

शिक्का

सही/- (विनायक शिंदे) सहायक आयुक्त
सा.प्र.वि. कर्मचारी भरती/पदोन्नती कक्ष.
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

क्र.मनपा/मसआक/०१/९७२/२०२५-२०२६
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका.
दिनांक : ०१/०८/२०२५.